UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९० • मार्च २०२२ पुरवणी विशेषांक





Dr. Minakshi Patil

इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

# ॥ संशोधक ॥

पुरवणी अंक - मार्च २०२२ (त्रैमासिक)

• शके १९४३ • वर्ष : ९० • अंक : ६

**संपादक मंडळ**

• प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे • प्रा.डॉ.मृदुला वर्मा • प्रा.श्रीपाद नांदेडकर

**सहसंपादक** : डॉ.अर्जुन नेरकर व डॉ.संजय खैरनार; डॉ.राजेंद्र त्रिभुवन.

✻ प्रकाशक ✻

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

मूल्य ₹ १००/-

वार्षिक वर्गणी ₹ ५००/-; आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना** : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळवणी** : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

**मुखपृष्ठावरील चित्र :**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका

१ ग्रामीण जीवन–व्यवहाराचे बदलते स्वरूप

– डॉ.गजानन भामरे, निमगाव, ता.मालेगाव ------- ०९

२ ग्रामीण साहित्यातील सामाजिकता

– प्रा.वर्षा अहिरे/ प्रा.सपना सोनवणे, मालेगाव - १५

३ दलित आत्मकथनातील समाज चित्रण

– प्रा.डी. ए. पाटील, शिरपूर, ता.धुळे ------- २०

४ डॉ.अ.वा.वर्टी यांच्या कथेतील ग्रामजीवनातून फुलणारा विनोद

– डॉ. अरूण पाटील, मालेगाव, जि.नाशिक ---------- २६

५ दलित कथाकार अण्णाभाऊ साठे

– डॉ.अर्जुन नेरकर, मालेगाव, जि.नाशिक -------- ३१

६ दलित जाणीव चित्रण करणारी 'झूल' एक अभ्यास

– डॉ.सोमनाथ पावडे, सुरगणा, जि.नाशिक -------- ३७

७ दलित साहित्यातील सामाजिकता

– डॉ. वैशाली पाटील, चाळीसगाव ------------- ४४

८ दलित साहित्यातील वेगळेपण

– डॉ.सौ.मिनाक्षी पाटील, मालेगाव, जि.नाशिक --- ५३

९ आंबेडकरी चळवळीचे शिलेदार वामनराव गरूड

– डॉ. स्वप्नील गरुड, देवळा, जि.नाशिक --------- ५८

१० ग्रामीण साहित्याची चळवळ

– डॉ. किरण पिंगळे ------------------------- ६७

११ साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्री समाजजीवन

– डॉ.सुरेखा जाधव, निफाड, जि.नाशिक ------- ७५

 ISSN No. 2394-5990

# दलित साहित्याचे वेगळेपण

– डॉ. मिनाक्षी पाटील, मालेगाव

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्योत्तर दलित लेखकांच्या पिढीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्व विचारांमुळे आणि त्यांनी संघटित केलेल्या दलित मुक्ती लढ्यामुळे आत्मभान आले होते. या देशातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर आधारलेल्या समाजात दलितांवर सर्वत्र वन चने चे जीवन लादले गेले होते. त्या वंचित जीवनाच्या वास्तव रूपाचे आत्मज्ञान दलितांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्व विचारातूनच झाले. स्वाभिमान, स्वावलंबन आणि अस्मिता या विचार प्रविण मुळे दलितांची अस्मिता जागृत झाली. शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा या तत्त्वोपदेशाने दलितांना आत्मबल लाभले. यामुळे साठोत्तरी दलित लेखकांची पीढी आत्मभान आणि आत्मबल लाभलेली होती.

आपल्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेत दलितांचे धार्मिक सामाजिक शोषण केले गेले. दलितांवर सामाजिक व मानसिक गुलामगिरी लादली गेली. ज्ञानापासून देखील दलित समाज समूह वंचित होता. माणूस असून माणसासारखे जगण्याची संधी अथवा अनुकूल परिस्थिती, स्वातंत्र्य दलितांना नव्हते. कान असून ऐकायचे नाही, डोळे असून पाहायचे नाही, तोंड असून बोलायचे नाही. अशा गुलामांना लाजिरवाण्या अवस्थेत दलित समाज जगत होता. परकीय सत्तेने देशावर लादलेल्या राजकीय पारतंत्र्य पेक्षा धर्म सत्तेने आणि समाज सत्तेने लादलेले पारतंत्र्य अतिशय भयावह होते. माणसासारखे जगण्यासाठी मूलभूत हक्क संघर्ष करूनच मिळवावे लागतात ही जाणीव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनीच करून दिली.

अनेक वर्षांच्या शतकांच्या गुलामगिरीत दलित समाज संवेदना बधीर झाल्यासारखा होता. मानवी जाणीवच तो हरवून बसला होता. त्याच्या जाणिवांना संवेदना साहित्यातून उद्धार लाभलाच नव्हता. माणूस असून माणसासारखे जगता येत नसल्यामुळे मानवी जीवनाचा खरा अर्थ अथवा मानवी जीवनाचे खरे

सारतत्त्व त्यांच्या जीवनात अभावाने होते. जीवनातला खरा त्रास भोगलेपण या सर्वांचे चित्रण साहित्यातून झालेच नव्हते. रामायणात शंभूकाचा वध झाला पण त्याची शोकांतिका कोणाला जाणवलीच नाही. महाभारतात एकलव्याला गुरुदक्षिणा म्हणून अंगठा कापून द्यावा लागला. ती वेदना देखील कोणाला कळलीच नाही. कोट्यावधी दलितांचे अशा व्यथा वेदना शतकानुशतके मुक राहिल्या. कारण गुलामगिरीने त्या समाजाला मुक बनविले होते.

**दलित साहित्याचे वेगळेपण :**

१९६० नंतर ग्रामीण स्त्रीवादी व दलित साहित्याचा उदय व विकास होऊ लागला. त्यातल्या त्यात ग्रामीण स्त्रीवादी साहित्यापेक्षा दलित साहित्याचे वेगळेपण काय ते लक्षात घेणे गरजेचे आहे तसा विचार केला तर हे तिन्ही प्रवाह चळवळीशी संबंधित आहे. तीनही प्रवाह प्रस्थापित साहित्यापेक्षा वेगळी भूमिका घेणारे आहेत.हे तीनही प्रवाह मानवतावादी मूल्यव्यवस्था मांडणीचा आग्रह धरतात.

ग्रामीण स्त्रीवादी साहित्य अशी तुलना करता दलित साहित्याचे वेगळेपण थोडक्यात असे नोंदवता येईल.

१. दलित साहित्याची मूळ प्रेरणा म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर. एवढी प्रबळ आदरणीय प्रेरणास्थान इतर वरील साहित्य प्रवाह यांच्या बाबतीत दिसत नाही.

२. दलित साहित्याच्या प्रेरणा डॉ.बाबासाहेबांच्या विचार व कार्यात आहे हे निश्चितपणे सांगता येते तसे इतर प्रवाह बाबत सांगता येत नाही.

३. दलित साहित्यात रंजकता नाही तर वैचारिकता आहे. एक संदिग्ध अशी वैचारिक बैठक आहे.

४. मुळात दलित साहित्याची भूमिका विघातक सनातनी संस्कृती नष्ट करण्याची आणि मनुष्याचे कल्याण समाजहित जपणारी नवी संस्कृती निर्माण करण्याची आहे अशी भूमिका ग्रामीण व स्त्रीवादी साहित्य दिसत नाही. दलित साहित्यात तो विशिष्ट जातीपुरता मर्यादित राहत नाही तर पारंपारिक सामाजिक व्यवस्थेत विविध स्तरातील सामाजिक शोषितांचे तो प्रतिनिधित्व करतो.

५. आंबेडकरी तत्त्वज्ञान घेऊन चळवळ उभी राहिली व चळवळीचे बळ घेऊन

 ISSN No. 2394-5990

साहित्य उभे राहिले व साहित्याने चळवळीला बळ देण्याचे काम केले.

एकूण थोडक्यात साहित्याचे वेगळेपण नोंदवताना दलित साहित्याचे सद्यकालीन वळण पाहणेही चूक ठरणार नाही. दलित साहित्याच्या बाबत असे मानले जाते की दलित साहित्याच्या पहिल्या पिढीने छळ, अन्याय, अपमान, दुःख अशा सर्वस्तरीय शोषणाची मांडणी केली. दुसऱ्या पिढीने हे सगळे ज्या व्यवस्थेने लाभले ती व्यवस्थाच मोडीत काढण्याच्या दृष्टीने नव्या ईहवादी मूल्य व्यवस्थेची मांडणी करून वैचारिकतेला कृतिशीलतेला जोड दिली. सध्याची तिसरी पिढी अधिक प्रगल्भ झालेली असून ती आंबेडकरी तत्त्वज्ञानाची मांडणी करत आहे. या पार्श्वभूमीवर श्रीपाल सबनीस यांची भूमिका महत्त्वाची ठरते ते म्हणतात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा निकष मान्य करून कोणत्याही व्यक्तीला संपूर्ण स्वातंत्र्य समर्पित करणे योग्य ठरते तेव्हा दलितांच्या तिसऱ्या, चौथ्या पिढीपर्यंत आलेल्या साहित्यिक विचारवंतांच्या शेकडो प्रतिभावंतांच्या पिढ्या डॉक्टर आंबेडकरांचे ऋण मान्य करूनही व्यक्ती आंबेडकर, महापुरुष आंबेडकर, आणि आंबेडकर वाद यांचे परखड समीक्षा करू शकत नाही?'

दलित साहित्याच्या प्रमुख प्रेरणा याबाबतीत अनेक अभ्यासक संशोधक वेगवेगळी प्रेरणा केंद्र अधोरेखित करतात. उदा. भगवान गौतम बुद्ध, फुले, शाहू, वि. रा. शिंदे, पेरियार स्वामी, चोखामेळा एवढेच नव्हे तर काही अभ्यासक केशवसुतांचे नाव घेण्यास मागेपुढे पाहत नाहीत, परंतु ठोस प्रतिमा मात्र डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची होय. विज्ञानाने माणसाला साधने दिली परंतु बाबासाहेबांनी दलित साहित्याला नवा विचार दिला. दलितांना माणूस म्हणून मूल्य प्राप्त करून दिले, दलितांचा जागृती घडवून आणली. बाबासाहेबांनी मूकनायक, जनता, समता, बहिष्कृत भारत, प्रबुद्ध भारत इत्यादी मुख्य पात्रे चालवून दलित समाजाला लिहिते केले, विचार करायला भाग पाडले. समाज मनात क्रांतीचे बीज रोवली. आम्ही देखिल माणसे आहोत याची जाणीव करून दिली. त्यामुळे दलित समाजाला आत्मभान आले आणि आत्मशोध ते घेऊ लागले.

दलितसाहित्य वेदना विद्रोह नकाराने दुःखातून जन्माला आले. इथल्या अन्यायकारक व्यवस्थेला हा नकार आहे, इथल्या मनुवादी संस्कृतीला देखील हा

नकार आहे, इथल्या शोषण मूलक संस्कृतीला देखील हा नकार आहे, इथल्या शेंदरी संस्कृतीला देखील हा नकार आहे. हे सर्व नाकारताना मात्र माणुसकी हे मूल्य आणि स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, ही तत्व दलित साहित्य कधीच नाकारत नाही.

तसेच दलित साहित्य ईश्वर संकल्पना नाकारते, जातीयता नाकारते आणि शोषण विरहीत समाजाची प्रतिस्थापना करते. तसे पाहिले तर मराठी मध्ये दलित साहित्याला १९८०च्या मुमारास फार मोठा प्रवाह सुरु झाला. या साहित्यातून दलित जीवनाचे विदारक आणि जीवघेणे चित्रण दलित लेखकांनी केले आणि मराठी मध्यमवर्गीय वाचकांची झोप उडवली. या प्रवाहात काही प्रक्षोभक आत्मचरित्रे प्रसिद्ध झाली. त्यात बलुतं-दया पवार, उपरा- लक्ष्मण माने, गबाळ-दादासाहेब मोरे, तराळ अंतराळ-शंकरराव खरात, जीनं आमचं- बेबी कांबळे, अक्करमाशी- शरणकुमार लिंबाळे, माझ्या जन्माची चित्तरकथा- शांताबाई कांबळे, मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे- माधव कोंडविलकर, बेरड- भीमराव गस्ती, आठवणींचे पक्षी- प्रल्हाद सोनकांबळे, रात्रंदिन- शांताबाई दाणी यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येतो.

मुळात दलित साहित्याच्या निर्मितीचेआदि कारण आत्मभान हे आहे तर दलित साहित्याच्या अविष्कार याला निरनिराळी रूपे देणारा आत्मशोध हा दलित साहित्यातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. ह्यात विद्रोहतून नकार व विद्रोहाची भाषा जन्माला येते. दलित स्त्रियांची आत्मकथने एक निराळे वास्तव उघडे करतात. हे वास्तव पांढरपेशा स्त्रियांना अपरिचित आहे. शांताबाई कांबळे यांचे माझ्या जन्माची चित्तरकथा हे आत्मकथन त्यातील निवेदनामुळे लक्षवेधी ठरते. यात काळाप्रमाणे निवेदन केले आहे अशा प्रत्येक आत्मकथनाचे अनेकविध अंगभूत वैशिष्ट्ये सांगता येतील. ही आत्मकथने भारतीय समाज व्यवस्थेतील विषमतेची अनेक पदरी कहानी प्रकाशित करतात.

**समारोप -**

अलीकडे दलित साहित्यात नकार आणि विद्रोहाला अविष्कार हा एका वेगळ्या पातळीवर होऊ लागला आहे. धर्म, परंपरा, संस्कृती इत्यादी पवित्र

ISSN No. 2394-5990

मांडणाऱ्या आणि त्या निमित्ताने दलितांना कायम गुलाम ठेवू पाहणाऱ्या प्रवृत्तीला नकार द्यावा हा महत्त्वाचा उद्देश स्पष्ट होतो. दलित साहित्यामुळे एक आत्मभान जागृत झाले, आत्म शोध लागला. वर्ण, जात, धर्म, संकेत इत्यादी ज्या-ज्या गोष्टी मानवी स्वातंत्र्याचा संकोच करतात त्याला दलित साहित्यात नकार दिला जातो. ह्यातच विद्रोह प्रकट होतो. या विद्रोहाच्या तळाशी मानवी स्वातंत्र्याचा पुरस्कार आहे. माणूस माणसाशी न्याय आणि समतेने वागेल असा आशावाद आहे. दलित साहित्य हा जीवन दर्शनाशी आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टीने बांधलेला आहे. शोषण विरहित समाजाची निर्मिती व्हावी म्हणून दलित साहित्य या प्रवाहाने आपली लेखणी झिजवली. दलित साहित्याला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्व विचारांचे अधिष्ठान आहे. दलित कविता, दलित कथा, दलित कादंबरी, दलित नाटक इत्यादी ललित साहित्य प्रकारांना ही वैचारिक त्याचे प्रमाण आहे. दलित साहित्याबरोबरच दलित वैचारिक वाङ्मय विपुल प्रमाणात निर्माण झाले. प्रस्थापित मराठी साहित्यातील निबंध हेदेखील दलित वाङ्मय आतील वैचारिक वाङ्मयाचे स्थान दाखवणारे आहेत. दलित साहित्य व्यक्ती अंतर्मनाचा एक धाव घेणारा साहित्यप्रकार आहे हे साहित्य केवळ कलावादी नाही तर ते निसंशय जीवनवादी साहित्य आहे.

**संदर्भसूची -**


१. वऱ्हाडे सदा, दलित साहित्य चिकित्सा, प्रथमावृत्ती, २००१.
२. भालचंद्र फडके, मराठी लेखिका चिंता आणि चिंतन, प्रथमावृत्ती १९८०, प्रास्ताविक.
३. सुभाष सावरकर, अक्षर वैदर्भी, जून २००७, माधव दलित साहित्य
४. अक्षर वैदर्भी, सुभाष सावरकर, एप्रिल २०१४, रेखा इंगोले, दलित साहित्य एक दृष्टीक्षेप.


* * *